वाचन वेध- वाचन संकल्प महाराष्ट्राचा

हा संपादकीय ग्रंथ सांगवी, पुणे येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संगीता जगताप,कॅप्टन डॉ. विठ्ठल नाईकवाडी,डॉ.विजय बालघरे यांनी संपादित केलेला आहे.पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे बाबुरावजी घोलप महाविद्यालय,सांगवी,पुणे हे प्रकाशक आहे. या ग्रंथाची प्रथम आवृत्ती २२ जुलै २०२५ रोजी प्रकाशित झाली आहे.या ग्रंथाचे मूल्य रुपये २५०/- इतके आहे. **'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'** या महाराष्ट्र सरकारच्या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत बाबुरावजी घोलप महाविद्यालय,सांगवी,पुणे या महाविद्यालयाने महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी वाचन,चिंतन केलेल्या ग्रंथांचा परीक्षण संग्रह साकार केला आहे.'वाचनवेध' हा पुस्तक परीक्षण संग्रह नावारूपाला आला आहे. या ग्रंथपरीक्षणपर पुस्तकात महाराष्ट्र,देश,विदेशातील एकूण शंभर ग्रंथांचा संक्षिप्त परिचय ग्रंथरूपाने बाबुरावजी घोलप महाविद्यालयाने साकारला आहे. उच्चशिक्षण देणारी महाविद्यालये ही केवळ शिक्षण देणारी केंद्रे नसून माहिती तंत्रज्ञान व ज्ञानाचा विस्तार करणारी पथदर्शक केंद्रे आहेत,हे या महाविद्यालयाने या संपादकीय ग्रंथातून सिद्ध करून दाखविले आहे.या ग्रंथात विशेषत: 'वसा आणि वारसा', 'मार्क ईस्सिस', 'त्यांना सावलीत वाढवू नका', 'डियर तुकोबा', 'इकिगाई', 'मॅक्झिम गार्की - आई', 'विचारधारा', 'हिज डे', 'शेती इस्रायलची', 'महात्मा गांधींची विचारसृष्टी', 'मजेत जगावं कसं? 'जनाबाईचे निवडक अभंग', 'शेतकऱ्याचा असूड', 'मन मे है विश्वास', 'गारंबीचा बापू', 'साहित्याचे तत्वज्ञान', 'क्रीडापत्रकारिता', 'नॉट विदाऊट माय डॉटर', 'चित्रातील भावविश्व', 'अंतरीचा मागोवा', 'इंटरनॅशनल ट्रेड अँड फायनान्स', 'पालावरची माणसं', 'कोलाज' 'आंबेडकरवाद', 'छावा','अजब शास्त्रज्ञांच्या अजब कथा', 'ब्युटी ऑफ लाईफ', परिवर्तन: शास्त्रही, कलाही', 'गांधारी', 'प्रकाशाचा विजय', 'दत्त संप्रदायाचा इतिहास', 'महाराज्ञी येसूबाई', 'अंत:अस्ति प्रारंभ', 'कर्मवीर भाऊराव पाटील आणि सत्यशोधक चळवळ', 'उपाशी', 'आय डेर', 'जंगलनामा', 'बटाट्याची चाळ', 'एनिमल फार्म' 'बिनपटाची चौकट', 'हेलपाटा, 'स्पर्श मिलनाचा', 'धुगंधर', 'द गॉड फादर', 'भंडारभोग', 'वादळ माथा', 'बौद्ध धम्माची नवी फसल' 'प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'एक व्यक्तीवेध', 'महात्मा जोतिराव फुले: वारसा आणि वसा',महात्मा फुले लिखित सार्वजनिक सत्यधर्म', 'मराठीतील पहिले सामाजिक नाटक: तृतीयरत्न', 'समाज सुधारक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे', 'अण्णाभाऊ साठे: साहित्य मूल्यमापन', ए.पी.जे. अब्दुल कलाम: एक व्यक्तीवेध', 'भारतीय साहित्याचे निर्माते: अण्णाभाऊ साठे', 'राजमातोश्री जिजासाहेब चरित्र', 'रारंगढांग', 'सामाजिक करार', 'रावण - राजा राक्षसांचा', 'ध्येय आणि दृढनिश्चयी सर्वोत्कृष्ट धनुर्धारी निषाधराजा एकलव्य', 'कोसला', 'आर्मी जनरलच व्हायचंय', 'अर्थात: अर्थशास्त्राशी संवाद साधणारे पुस्तक', 'जोहार', 'अ गुड गर्ल्स गाईड टू मर्डर', 'आत्मघातकी दहशतवाद', 'आदिवासी साहित्य: एक मुख्य प्रवाह', 'उपरा', 'चिंध्याच्या बाहुल्या', 'तणकट', 'प्रक्षोभ',सूड' इ. विश्वसाहित्यातील विविध साहित्यकृतींचा आस्वादक परिचय मराठी वाचकाना घडविला आहे. मराठी वाचकाना प्रेरणादायी ठरेल असा हा परीक्षण संग्रह आहे. नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी या ग्रंथाची पाठराखण केली आहे.या ग्रंथाच्या पाठराखणमध्ये डॉ.मनोहर चासकर म्हणतात की,''वाचन ही सवय नाही,ती संस्कृती आहे.ही संस्कृती रुजवण्यासाठी असे उपक्रम म्हणजे एक प्रेरणास्त्रोतच.आज डिजिटल युगातही वाचनाचे महत्व अजिबात कमी झालेले नाही.उलट त्याचे स्वरूप अधिक व्यापक आणि विविध अंगी झाले आहे.अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मपरीक्षण व चिंतनाची क्षमता वृद्धिंगत होते. या ग्रंथ परीक्षण संग्रहामुळे

पान ५ वर....

घास व घास...

..... वाचन संकल्प महाराष्ट्राचा

महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी व लेखक इ. ना लेखक होण्याची उत्तम संधी प्राप्त झाली आहे. कविता, कथा, कादंबरी,आत्मकथनपर कादंबरी,नाटक, चरित्र- आत्मचरित्र, लेख, ललितलेख, वैचारिक लेख, पत्रकारिता, कृषीपत्रकारिता,भाषण, संभाषण, साहित्याचे तत्वज्ञान, महापुरुषांवरील चरित्रपर लेखन, मराठीतील अध्यात्मिक, सांप्रदायिक लेखन, ऐतिहासिक चरित्रपर लेखन, विनोदी लेखन, निसर्गपर लेखन, भटक्या विमुक्तांचे साहित्य,दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य,तृतीय पंथीयाचे साहित्य इ.मराठीतील विविध प्रकारातील साहित्य कृतीचा परिचय नवीन पिढीला संपादक व्हीनी पढविला आहे. वाचन संस्कृतीची जोपासना या ग्रंथातून झाली आहे.साहित्य, कला,संस्कृतीचे जतन आणि संवर्धन या निमित्ताने झाले आहे. महाराष्ट्र सरकारच्या,'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या राज्यव्यापी, सामूहिक उपक्रमाचे हे यशस्वी फलीत आहे,असे वाटते.या उपक्रमाचा हा साहित्यिक दस्तऐवज नवीन पिढीला उद्बोधक ठरेल असा हा ग्रंथ आहे.या संपादनातील १०० ग्रंथांचा परिचय मुळातूंच वाचण्यासाठी हे संपादकीय लेखन मराठी वाचकांना प्रेरित करेल,प्रवृत्त करेल,प्रोत्साहित करेल हेच या ग्रंथाचे यश आहे, असे वाटते.या नवोपक्रमाचे मराठी भाषिक नक्कीच स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर जाल्हेकर,
बी.डी.काटे महाविद्यालय, पोंढेगाव ता.आंबेगाव जि.पुणे